पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५

# 'विवेकानंद'तर्फे किसान दिन साजरा

**कोल्हापूर :** माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांच्या जयंतीनिमित्त विवेकानंद महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने किसान दिन कळंबा येथील शेतामध्ये साजरा करण्यात आला. उपक्रमातून विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत आधुनिक, पारंपरिक शेतीविषयक माहिती दिली. कार्यक्रमात वनस्पतीशास्त्र विभागातील बी. एस्सी. भाग तीनच्या विद्यार्थ्यांनी कळंबा परिसरातील शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेतली. विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत शेतीतील विविध अडचणी, हवामान बदलाचा परिणाम, उत्पादन खर्च, कीड व रोग व्यवस्थापन, तसेच बाजारपेठेतील समस्याबाबत माहिती घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी देशी वाणांचे महत्त्व, त्यांचे संवर्धन, कमी खर्चात अधिक उत्पादन, तसेच पर्यावरणपूरक शेती पद्धती याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. एस.पी. थोरात तसेच वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. भाऊराव दांगट यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. डॉ. अभिजित कासारकर यांनी परिश्रम घेतले.